# श्री आशिर्वाद सहकारी गृहरचना संस्था मर्यादित.

पत्ता :- स.नं.९/३/४/अे,कोथरूड, पुणे :-४११ ०२९.

नोंदणी क्र.:- पीएन्ए/पुणे सिटी/एच्एसजी/१७४८/८२ दि.२३/०२/१९८२.

---

## पुनर्विकास विशेष सर्वसाधारण सभेचा वृत्तांत

श्री आशिर्वाद सहकारी गृहरचना संस्थेची विशेष सर्वसाधारण सभा दिनांक १८.०६.२०२३ रोजी सायंकाळी ०५.३० वाजता होती परंतु कोरमअभावी ही सभा अर्धा तास तहकुब केली. तदनंतर ही सभा ०६.०० वाजता सुरुवात करण्यात आली. संस्थेच्या आवारामध्ये ही सभा आयोजित करण्यात आली होती. सदर मिटींगमध्ये प्रत्यक्ष उपस्थित असणाऱ्या सभासदांची संख्या १६ आणि झुम मिटींगच्या मिटींगच्या माध्यमातुन उपस्थित असलेल्या सभासदांची संख्या ०६ होती. श्री. बिपीन इनामदार यांनी संस्थेसाठी निवड झालेले विकसक, प्रकल्प सल्लागार श्री.संजय सुर्यवंशी आणि उपस्थित सभासदांचे स्वागत करून सभा चालु करण्यात आली.

**विषय क्रमांक ०१:-** यु.एल.सी.च्या मुद्याबाबत चर्चा करून निर्णय घेणे.

**ठराव क्रमांक ०१:- संस्था आणि विकासक यांचे मध्ये ठरलेल्या MOU मधील तरतुदीनुसार , यू एल सी ची रक्कम सोसायटी भरणार आहे , परंतु एकूण खर्चामध्ये रुपये १० लाख बिल्डर देणार आहेत. तरी बिल्डर यांनी सांगितल्या नुसार सदर पैकी रुपये ३० लाख अंदाजे चलन भरणे अपेक्षित आहे , तो संस्थेच्या वतीने बिल्डर भरतील आणि संस्थेस देण्यात येणाऱ्या कॉर्पस फंड मधून ते वजा केले जातील , तसेच बिल्डर यांचेकडून देण्यात येणारी रक्कम ही यु एल सी बाबत येणाऱ्या वरील खर्च देण्यात येणार आहे . वरील सर्व चर्चा सभेपुढे झाली त्यानुसार वरील ठराव पास करण्यात आला.**

**ठराव सर्वसंमत**

**श्री आशिर्वाद सहकारी गृहरचना संस्था मर्यादित.**

पत्ता :- स.नं.९/३/४/अे,कोथरूड, पुणे :-४११ ०२९.

नोंदणी क्र.:- पीएन्ए/पुणे सिटी/एच्एसजी/१७४८/८२ दि.२३/०२/१९८२.

---

सुचक:-श्री.पालकर अनुमोदक:-श्री.के.ए.खंडेलवाल

**विषय क्रमांक ०२:** पुनर्विकास प्रक्रियेमध्ये ज्या सभासदांनी समजुतीचा करारनामा आणि संमतीपत्रावर सहया केल्या नाही याबाबत चर्चा करून निर्णय घेणे.

**ठराव क्रमांक ०२:- पुनर्विकास प्रक्रियेमध्ये आतापर्यंत समजुतीचा करारनामा आणि संमतीपत्रावर ३६ पैकी ३४ जणांच्या सहया झाल्या आहेत. परंतु ज्या सभासदांच्या सहया झाल्या नाही किंवा ते कोणत्याही प्रकारे सहकार्य सुध्दा करीत नाहीत अशा सभासदांसोबत कायदेशीर कार्यवाही चालु करण्याचा निर्णय सर्व सभासदांसमोर सभेमध्ये घेण्यात आला आणि सर्व सभासदांनी या कार्यवाहीबाबत हा ठरावावर बहुमताने निर्णय घेण्यात आला.**

**ठराव सर्वसंमत**

सुचक:-श्रीमती.पाडळकर अनुमोदक:-श्री.वाघुळदे

**विषय क्रमांक ०३:** पुनर्विकास प्रक्रियेमध्ये ज्या सभासदांना वाढीव एरिया खरेदी करायचा आहे त्याबाबतीतील रूपरेषा ठरवणे.

**ठराव क्रमांक ०३:- ज्या सभासदांना वाढीव एरिया खरेदी करायचा आहे त्यावर चर्चा करताना सर्वानुमते असे ठरले की, संस्थेच्या नावाने नवीन खाते ओपन करून वाढीव एरिया संदर्भातील रक्कम संस्थेच्या नावे जमा करावी आणि त्यानंतर विकसकासोबत करारनामा आणि प्लॅन संदर्भात Sanctioning Process चा पार्ट पुर्ण झाला की, ती रक्कम विकसकाला देण्यात यावी**

**श्री आशिर्वाद सहकारी गृहरचना संस्था मर्यादित.**

पत्ता :- स.नं.९/३/४/अे,कोथरूड, पुणे :-४११ ०२९.

नोंदणी क्र.:- पीएन्ए/पुणे सिटी/एच्एसजी/१७४८/८२ दि.२३/०२/१९८२.

---

**याचे याचे स्वरूप व्यवस्थापक समितीमध्ये ठरवुन त्याबाबतचा निर्णय सभेमध्ये घेण्यात आला आणि ठरावा बहुमताने पास करण्यात आला.**

**ठराव सर्वसंमत**

सुचक:- श्री.मारूती बोरकर अनुमोदक:-सौ.शिल्पा पाटणकर

**विषय क्रमांक ०४:** सादरीकरणामध्ये दाखविण्यात आलेल्या फ्लोअर प्लॅनला मान्यत देण्याबाबत.

**ठराव क्रमांक ०४:** संस्थेचे विकसक श्री.हर्षवर्धन पुंगलिया आणि रोहन दुधेडीया यांनी सभेमध्ये संस्थेचा फ्लोअर प्लॅन कसा असेल, त्यामध्ये २बीएचके आणि ३बीएचके चा फ्लॅट कशा स्वरूपाचा असेल आणि या याचे उत्तम पध्दतीने सादरीकरण दाखविले आणि या फ्लोअर प्लॅनला सर्वानुमते मान्यता देण्यात आली. आणि यापुढे प्लॅन मध्ये कोणतेही बदल केले जाणार नाही याची सर्व सभासदांनी नोंद घ्यावी असेही ठरले आणि हा ठराव पास करण्यात आला.

**ठराव सर्वसंमत**

सुचक :-श्री. डी.ई.पाटिल अनुमोदक:-श्री.एल.व्ही.राशिंगकर

यानंतर श्री.बिपीन इनामदार यांनी उपस्थित राहिलेल्या सर्व सभासदांचे, मावी स्पेसचे श्री. हर्षवर्धन पुंगलिया आणि रोहन दुधेडीया आणि प्रकल्प सल्लागार श्री.संजय सुर्यवंशी यांचे संस्थेच्या वतीने आभार मानले आणि आजची सभा संपल्याचे जाहीर केले.

श्री आशिर्वाद सहकारी गृहरचना संस्थेच्या वतीने

अध्यक्ष सचिव खजिनदार